-: प्रेस नोट :- दिनांक :- १७/०९/२०२३.

## ‘‘ ७ वर्षांपासून पोलीसांना गुंगारा देत आंतरराज्यीय पातळीवर जबरी चोरी करणाऱ्या दोन दरोडेखोरांना गुन्हे शाखा, मुंबई यांनी केली अटक .’’

महाराष्ट्रसह भारतातील विविध राज्यांमध्ये पोलीस असल्याची बतावणी करून तसेच शस्त्रांचा धाक दाखवून मोठ मोठया जबरी चोरी करणाऱ्या टोळीच्या काही दरोडेखोरांबाबत कक्ष ९ चे प्रभारी पोलीस निरीक्षक दया नायक यांना त्यांच्या गुप्त बातमीदाराकडून विश्वसनिय माहिती प्राप्त झाली. हे दरोडेखोर ठराविक काळानंतर स्वत:चे मोबाईल क्रमांक तसेच राहण्याचे ठिकाण बदलुन पोलीसांना गुंगारा देत असल्याचेही बातमीदाराने सांगितले होते. कक्ष ९ येथे कार्यरत पोलीस अधिकारी व अंमलदारांनी मागील काही दिवस या दरोडेखोरांच्या वेगवेगळया मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण केले. त्यावरून या दरोडेखोरांच्या संभाव्य राहत्या ठिकाणांची माहिती प्राप्त करून त्या ठिकाणांवर सतत पाळत ठेवली.

या दरम्यान असे समजून आले की, हे दोन दरोडेखोर बदनापुर, जि. जालना या पोलीस ठाण्यातील गु.र. क्र.१२४/१६ कलम ३९५, ३९७, १२०(ब) भादवि सह ४, २५ हत्यार कायदा या गुन्हयातील पाहिजे आरोपी आहेत. मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण व प्रत्यक्ष ठेवण्यात आलेलया पाळतीवरून सदर दोन्ही पाहिजे आरोपी मालाड पुर्व परिसरात येणार असल्याची माहीती प्राप्त करण्यात आली. यावरून मालाड पुर्व परिसरात कक्ष -९ च्या पोलीस अधिकारी व अंमलदारांनी अहोरात्र सापळा लावुन खालील दोन दरोडेखोरांना ताब्यात घेतले.

१) गणेश पांडुरंग भोसले उर्फ महाराज उर्फ पप्पु, वय -४७ वर्षे,व्यवसाय-इस्टेट एजंट,सध्याचा राहण्याचा पत्ता-चित्रकुट सोसायटी, रूम नं. २०३, ए विंग, नाशिक.
२) संजु सुनका डोकरे उर्फ अमित उर्फ दद्दु उर्फ सुका, वय -४३ वर्ष, सध्याचे राहण्याचे ठिकाण- वडारी पाडा, नेवतीया रोड, नल्ला बाबुजी चाळ,रूम नं. ०२, मालाड पुर्व, मुंबई.

सदर आरोपिंकडे चौकशी केली असता त्यांनी बदनापुर पोलीस ठाणे येथील गुन्हयात सहभाग असल्याचे मान्य केले. माननिय वरिष्ठांच्या मान्यतेने सदर बाबत स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांना कायदेशीर संदेश देण्यात आला. या दरम्यान वर नमुद आरोपिंकडे कौशल्यपुर्ण चौकशी केली असता त्यांनी महाराष्ट्रात तसेच आंध्र प्रदेश, तेलंगाणा, उत्तर प्रदेश व इतरही राज्यांमध्ये जबरी चोरीचे अनेक गंभीर गुन्हे केले असल्याची माहीती दिली. यामध्ये हैद्राबाद येथील मुथ्थुट फायनान्स येथे ४४ किलो सोन्याच्या जबरी चोरीचा समावेश आहे. आरोपी गणेश भोसले हा उत्तर प्रदेश येथील कोखराज पोलीस ठाणे, जिल्हा कोशंबी येथील गुन्हा क्र. ४५/२३ कलम ३(१) युपी गॅगस्टर ॲक्ट या गुन्हयात पाहीजे आरोपी असल्याची माहीती समजुन आली. या बाबत संबंधीत तपासी अधिका-यास माहीती देण्यात आली आहे. सध्या दोन्ही आरोपींचा कायदेशिर ताबा स्थानिक गुन्हे शाखा, जालना यांना देण्यात आलेला आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शशि कुमार मीना, पोलीस उप-आयुक्त (प्र-१) श्री. अमोघ गावकर, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-पश्चिम) श्री. महेश देसाई यांच्या मागदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. दया नायक, पोनि श्री. सचिन पुराणिक, पोनि श्री. दिपक पवार, सपोनि श्री. उत्कर्ष वझे, सपोनि श्री. महेंद्र पाटील, स.फौ. नरेंद्र पालकर, सफौ संतोष काकडे, पोह सुभाष शिंदे, पोह सुनिल म्हाळसंक, पोह संजय भोसले, पोह जितेंद्र शिंदे, पोह भिकाजी खडपकर, पोह दत्तात्रय कोळी, पोह सचिन राउत, पोह संतोष लोखंडे, पोह महेश मोहिते, पोह राहुल पवार, पोह बाबासाहेब शेळके, पोशि वैभव पाटील, मपोशि साधना सावंत, पोशि प्रशांत भुमकर, पोशि अमोल सोनवणे, पोशि शार्दुल बनसोडे, पोशि राकेश कदम, पोशि सुशांत गवते, मपोशि प्राजक्ता धुमाळ, पोशि गितेश कदम, पोहचा विनायक परब, पोहचा अविनाश झोडगे, पोनाचा शशिकांत निकम यांनी केली आहे.